# उल्हासनगर महानगरपालिका
## मालमत्ता कर विभाग

मुख्य कार्यालय, तळमजला, उल्हासनगर-४२१ ००३ जिल्हा ठाणे, महाराष्ट्र

Tel No:- 95251-2720116/125 Ext.No.238 Fax No.95251-2720104


जा क्र उमपा/कर विभाग/यु-७/१००/२०२३ दिनांक २०/०६/ २०२३

संदर्भ - १) विशेष नोटीस क्र उमपा/कर विभाग/यु.७/४९/४२ दिनांक ०६/०६/२०२३
२) श्री. रामनारायण एम. मुदडा, यांनी दिनांक १०/०५/२०२३
रोजी दाखल केलेली हरकत (ना.सु.केंद्र टोकन नं ४१२०२३००००८६२९
३) जा.क्र.उमपा/कर विभाग/४२ दिनांक १२/०६/२०२३ रोजीची सुनावणी नोटीस
४) सुनावणी दिनांक २०/०६ /२०२३

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. ४९सीआय०१८७६३७०० (मानेरा रोड, राम रक्षा हॉस्पीटल निअर टेलीफोन एक्चेंज, उल्हासनगर- ४) अन्वये नोंद असलेल्या मिळकतीकरीता कर निर्धारणा संबंधी संदर्भ क्र. १ अन्वये विशेष नोटीस बजावण्यात आली आहे.

उक्त नोटीसच्या अनुषंगाने संदर्भ क्र.२ अन्वये कर आकारणी अनधिकृत बांधकाम शास्ती आकरण्यात आली आहे. ती मान्य नसल्यामुळे सदरची कर आकारणी दुरुस्त करावी अशी हरकत दाखल केली आहे.

उक्त हरकतीच्या अनुषंगाने संदर्भ क्र. ३ नुसार संबंधितास दिनांक ३१/०५/२०२३ रोजी सुनावणीस उपस्थित राहणेबाबत नोटीस बजावण्यात आली आहे

दिनांक २०/०६/२०२३ रोजी सुनावणीस श्री. रामनारायण एम. मुदडा, हे हजर असुन त्यांनी अनधिकृत बांधकाम शास्ती रद्द करावी असे त्यांचे लेखी अर्जाद्वारे निवेदन सादर केले आहे.

अर्जासोबत सादर केलेले कागदपत्रः बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र दिनांक. १३/०८/१९९८, बांधकाम नकाशे मंजुरी दिनांक. १३/०८/१९९८,

त्यामुळे संदर्भिय मिळकतीचे क्षेत्रफळ, वापर, बांधकाम प्रकार विशेष नोटीष प्रमाणे बरोबर आहे. सबब, श्री. रामनारायण एम. मुदडा यांनी दाखल केलेंली हरकत अमान्य संदर्भित मिळकती करीता विशेष नोटीष नुसार निश्चित करण्यात आलेले करयोग्य मुल्य व आकारणी कायम करण्यास शिफारस करण्यात आली आहे.

यास्तव मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी पुस्तकात मालमत्ता क्र. ४९सीआय०१८७६३७०० (मानेरा रोड, राम रक्षा हॉस्पीटल निअर टेलीफोन एक्चेंज, उल्हासनगर- ४) अन्वये नोंद असलेल्या मिळकती करीता विशेष नोटीस नुसार निश्चित करण्यात आलेले करयोग्य मुल्य व आकारणी कायम करून श्री. रामनारायण एम. मुदडा यांनी दाखल केलेंली हरकत अमान्य, सबंधित मिळकतधारकास वर्ष २०२३-२०२४ करीता बिल बजावण्यात यावे.

(प्रियंका राजपूत)
उप आयुक्त (कर)
उल्हासनगर महानगरपालिका

प्रति,
१) मे कोल्ब्रो ग्रुप, नागपुर
२) श्री. रामनारायण एम. मुदडा, रा. मानेरा रोड, राम रक्षा हॉस्पीटल निअर टेलीफोन एक्चेंज, उल्हासनगर- ४